
म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे
विषय बा.वा.
दा.क्र. ४६५

# थोरले माधवराव

म.ग्रं.सं. वाचनालय, ठाणे
विषय बा.वा.
दा. क्र. ४६५



BV K-0 00465

# थोरले माधवराव

: लेखक :

भा. म. वैद्य

म. ग्रं. सं. ठाणें, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग
दा. क्र. ४६५ दिनांक ....
विषय बा. वा. क्र. ......

BVBK-0400465

ज्योत्स्ना प्रकाशन

मूल्य एक रुपया

मुलांनो, शिवाजी महाराजांनी स्वराज्याचे तोरण बांधले. औरंग्या पापी बुडवला. असुरांचा नाश केला. स्वराज्याची स्थापना केली. पुढे त्यांचेच हे थोर कार्य पेशव्यांनी मोठ्या पराक्रमाने चालविले.

पहिल्या बाजीरावाने तर मराठी फौजा थेट दिल्लीपर्यंत नेऊन भिड-वल्या.मराठी राज्याचे साम्राज्य त्या थोर पेशव्याने केले. त्यानंतर नानासाहेब पेशवे अधिकारावर आले. त्यांचे कारकीर्दीत तर मराठी राज्याचा विस्तार चोहोकडे झाला. मराठी फौजा अटकेपार गेल्या.

पुढे पानिपतचे युध्द झाले नि मराठी राज्यास उतरती कळा लागली. तरी पण थोरले माधवराव पेशवे यांनी अगदी लहान वयात अवघ्या दहा-बारा वर्षांत जे प्रचंड कार्य केले त्याला भारताचे इतिहासात तोड नाही. त्यांचे चरित्र स्फूर्तिदायक आहे. आमचे लेखक श्री. भा. म. वैद्य यांनी ते अतिशय सोप्या भाषेत मुलांसाठी लिहिले आहे. या पुस्तकाचे स्वागत आपण सहर्ष कराल यात काहीच शंका नाही.

—**प्रकाशक**

प्रथमावृत्ती : महाराष्ट्र दिन, १ मे १९७५.

मुद्रक : एच. बी. घाणेकर, न्यू एज प्रिंटिंग प्रेस, ८५, पी. बाळू मार्ग, मुंबई २५.
प्रकाशक : ल. गो. परांजपे, ज्योत्स्ना प्रकाशन, ३० सी. खोताची वाडी, मुंबई ४.



१

मुलांनो, आपल्या भारतात अनेक थोर पुरुष होऊन गेले. अशा थोर पुरुषांपैकीच थोरले माधवराव पेशवे हे एक होत.

माधवरावांचा जन्म १९ फेब्रुवारी १७४९ रोजी झाला. त्यांचे वडील पेशवे नानासाहेब व आई गोपिकाबाई.

माधवरावांचे बालपण त्यांच्या आई-वडिलांच्या सहवासात सुखात गेले. त्यांची आई–गोपिकाबाई मोठी हुशार

व मानी स्त्री होती. ती करारी असल्यामुळे सर्वांवर तिचा वचक होता.

माधवरावांचे चुलते सदाशिवरावभाऊ मोठे पराक्रमी व कडक शिस्तीचे होते. त्यांच्यामुळे माधवरावांनाही लहानपणापासून शिस्तीने वागण्याची सवय लागली.

त्या काळात शिक्षणासाठी शाळा नव्हत्या; त्यामुळे माधवरावांचे बालपणीचे शिक्षण घरीच झाले.

लेखन, वाचन, हिशेब ठेवणे, संस्कृत



व इतर व्यवहारांच्या शिक्षणाबरोबरच घोड्यावर बसणे, नेमबाजी करणे, भाला व तलवार अशी शस्त्रे योग्य प्रकारे वापरणे यांसारख्या गोष्टींचेही शिक्षण त्यांना मिळाले.

ह्या शिक्षणाचा व घरातील इतर मोठ्यांच्या अनुभवांचा माधवरावांना पुढे राज्यकारभार चालविताना चांगला उपयोग झाला.

२

माधवरावांचे आजोबा पेशवे थोरले बाजीराव मोठे पराक्रमी पुरुष होते. त्यांनी अनेक लढाया करून मराठ्यांचे राज्य खूप वाढविले.

त्यांच्यानंतर माधवरावांच्या वडिलां-



पहिला बाजीराव

कडे म्हणजे बाळाजी बाजी-राव उर्फ नानासाहेबांकडे पेशवेपद आले. त्यांनीही मराठी राज्याचा दरारा कायम टिकविला होता.


परंतु शेवटी अफगाणिस्तानच्या अहमदशहा अब्दालीचा बंदोबस्त करण्यासाठी झालेल्या पानिपतच्या लढाईत मराठ्यांचा पराभव झाला. अनेक शूर सरदार ह्या लढाईत मारले गेले.

माधवरावांचे थोरले बंधू विश्वासराव व चुलते सदाशिवराव हेही या लढाईत मारले गेले. मराठ्यांचे खूप मोठे सैन्यही कामास आले.

ह्या पराभवाच्या धक्क्याने नाना-साहेब बेचैन झाले व थोड्याच दिवसात

मरण पावले.

ह्या वेळी माधवराव सोळा वर्षांचे होते. अशा लहान वयातच त्यांच्यावर पेशवेपदाचे मोठ्या जबाबदारीचे काम पडले. ही जबाबदारी माधवरावांनी चांगल्या प्रकारे सांभाळून मराठी राज्याचे झालेले नुकसान भरून काढले व पूर्वीसारखा दरारा बसविला.



३

माधवराव पेशवे झाले तेव्हा मराठी सैन्याची खूपच हानी झाली होती.

मराठ्यांचा अगदी नजिकचा शत्रू हैद्राबादचा निजाम. त्याने ह्या संधीचा फायदा घेऊन मराठी राज्यावर स्वारी करण्याचे बेत सुरू केले.

अनेक मराठी सरदारांना फितुर करून त्याने आपल्या बाजूस घेतले. त्याचा मुख्य कारभारी विठ्ठल सुंदर याच्याकडे मराठी राज्यावर स्वारी करण्याची कामगिरी दिली.



राघोबादादा

याच सुमारास माधवरावांचे चुलते रघुनाथरावदादा यांना पेशवेपदाच्या अधिकाराची हाव सुटली. ते माधवरावांना न विचारताच कारभार पाहू लागले.

बाहेरचे शत्रू व घरातील भांडणे अशा दुहेरी संकटात माधवराव सापडले, पण आपल्या अंगच्या हुशारीने, कडक शिस्तीने व बाणेदारपणाने ह्या दुहेरी संकटाला तोंड देऊन त्यांनी मराठी राज्याचा पूर्वीप्रमाणे—दरारा बसविला.

४

पेशव्यांची आपसातील भांडणे व माधवरावांसारखा अनुभव नसलेला पेशवा, अशा वेळी आपण मराठी राज्यावर हल्ला केल्यास मराठी मुलूख आपणास सहज जिंकून घेता येईल, असा विचार करून निजामाने मोठे सैन्य बरोबर घेऊन मराठी राज्यावर हल्ला सुरू केला. पुणे शहरावर प्रथम

हल्ला करून तेथे लुटालूट व जाळपोळ सुरू केली.

माधवरावांना हे समजताच ते संतापले. रघुनाथराव दादानेही आपला हट्ट सोडला. त्यांनी खूप मोठे सैन्य घेऊन निजामाच्या मुलुखावर स्वारी केली. अनेक ठिकाणी निजामाच्या सैन्याचा पराभव केला.



पेशव्यांचा हा पराक्रम पाहून निजामाला मिळालेले मराठी सरदार पेशव्यांना येऊन मिळाले. तेव्हा घाबरून निजाम परत हैद्राबादकडे निघाला; पण वाटेत गोदावरी नदीच्या कांठी राक्षसभुवन जवळ पेशव्यांच्या सैन्याशी त्याची गाठ पडली. तेथे भयंकर लढाई होऊन निजामाचा पूर्ण पराभव झाला. त्यात पुष्कळ युध्दसामुग्री मराठ्यांना मिळाली. विठ्ठल सुंदर हा निजामाचा मुख्य कारभारी ह्या लढाईत मारला गेला.

माधवरावांचा पराक्रम पाहून राघोबादादाही भांडण विसरले व त्यांनी पेशवाईचा सगळा कारभार माधवरावांकडे सोपविला.

माधवरावांचा पराक्रम पाहून सर्वांनाच

त्यांचे मोठेपण समजले. सगळे प्रजाजन त्यांना आदराने रावसाहेब म्हणू लागले.

५

निजामाचा पराभव झाला व घरचे भांडणदेखील मिटले, हे पाहून माधवरावांना बरे वाटले.

ह्याच सुमारास कर्नाटकातील म्हैसूरचा हैदर अली याने मराठी राज्यावर हल्ले करून मराठी राज्य नाहीसे करण्याचा विचार सुरू केला. हैदर अत्यंत कपटी होता. म्हैसूरच्या हिंदू राजाला कपटाने बाजूला सारून तो म्हैसूरचा राजा बनला होता.

मराठ्यांना आपण सहज जिंकू असे त्याला वाटत होते. त्याने कर्नाटकातील

अनेक मराठी सरदारांना जिंकले.

ह्या सरदारांपैकी सावनूरचे सरदार देसाई यांनी हैदरचा बंदोबस्त करण्याची पेशव्यांना विनंती केली. माधवरावांनी लागलीच हैदरवर स्वारी करण्याचे नक्की केले.



मोठे सैन्य उभारून त्यांनी हैदर-वर स्वारी केली व हैदराचा पराभव

केला; त्यामुळे हैदराला पेशव्यांबरोबर तह करणे भाग पडले.

माधवरावांच्या अशा पराक्रमामुळे सगळीकडे मराठ्यांचा दरारा बसला.


६

हैदराने पराभवानंतर मधून मधून पेशव्यांना त्रास देण्याचे आपले काम सुरूच ठेवले होते. त्याचा कायमचा बंदोबस्त करण्याचे ठरवून माधवरावांनी आपल्या अनेक मराठे सरदारांच्या मदतीने हैदराचा अनेक ठिकाणी पराभव केला.

पण ह्याच सुमारास माधवरावांची प्रकृती बिघडली. त्यामुळे हैदराशी तह करून ही मोहीम बंद करावी लागली.

इकडे राघोबादादा पुन्हा आपसात तंटे करून अर्ध्या राज्याची मागणी करू लागला.

पूर्वी माधवरावांनी भांडणांना कंटाळून सर्व कारभार राघोबाकडे दिला होता. पण ह्यावेळी त्याची गय करावयाची नाही असे ठरवून त्यांनी राघोबाला सांगितले की, "राज्य माझे नाही प्रजेचे आहे. मी राज्याचा सेवक आहे. याउपर



तुम्ही गोंधळ केला तर त्याचा मला बंदोबस्त करावा लागेल. हे उत्तर ऐकूनही

राघोबाने भांडण सुरूच ठेवले; तेव्हा माधवरावांनी आपल्या विश्वासू सरदारांचा सल्ला घेऊन राघोबादादाला पकडून पुण्यास नजरकैदेत ठेविले.



सतत युद्ध व आपसातील भांडणे ह्यामुळे माधवरावांची प्रकृती बिघडली. त्यांना सतत ताप येऊ लागला. निरनिराळे उपाय सुरू झाले, पण माधवरावांची प्रकृती सुधारण्याचे चिन्ह दिसेना.

सन १७६१ साली पेशवेपद मिळाल्यापासून पुढील दहा वर्षे फार दगदगीची गेली.

ह्या दहा वर्षांत त्यांनी आपल्या शेजारचे शत्रू निजाम व हैदर ह्यांना तर अद्दल घडविलीच, पण पानिपतच्या पराभवामुळे उत्तर हिंदुस्तानात कमी झालेला मराठ्यांचा वचक शिंदे--होळकरांसारख्या पराक्रमी सरदारांच्या मदतीने पुन्हा बसविला व दिल्लीच्या बादशहाच्या संरक्षणाची जबाबदारी पार पाडली. तसेच--इंग्रजांसारख्या परक्या लोकांच्या हाती आपला प्रांत जाऊ नये म्हणूनही त्यांनी प्रयत्न केला.

असे देशभक्त होते माधवराव.

अशा प्रकारे पराक्रम गाजवीत असतानाच माधवरावांची प्रकृती दिवसें-दिवस अधिकच बिघडू लागली. शेवटी शेवटी तर त्यांना उठण्याची ताकद राहिली नाही.



माधवरावांच्या पत्नी रमाबाई ह्यांनी त्यांना बरे वाटावे म्हणून खूप कष्टकारक नेम पाळले. अनेक प्रकारच्या औष-धांचे उपचार झाले; पण कोणत्याच

उपचारांचा उपयोग झाला नाही. त्यांचे क्षयाचे दुखणे वाढतच गेले.

पेशवे घराण्यातील सर्वांची श्रीगणेशावर फार भक्ती होती. आपण आता जगत नाही हे माधवरावांच्या ध्यानी आले. आपले शेवटचे दिवस श्रीगजाननाच्या जवळ राहून जावेत म्हणून त्यांनी थेऊर येथील गणेश मंदिरात रहावयाचे ठरविले.

तेथेही त्यांच्या पत्नीने त्यांची खूप सेवा केली, पण कशाचाच काही उपयोग झाला नाही. त्यांच्या प्रजेचे त्यांच्यावर फार प्रेम होते त्यामुळे त्यांच्या दर्शनासाठी रोज हजारो लोक येत होते.

शेवटी दुखणे विकोपास जाऊन

दिनांक १८ नोव्हेंबर १७७२ रोजी ह्या थोर पराक्रमी पेशव्याचे निधन झाले. साऱ्या महाराष्ट्राला अत्यंत दुःख झाले.

त्यांची पत्नी साध्वी रमाबाई सती गेली.



८

पेशवे थोरले माधवराव हे महापराक्रमी शूर वीर तर होतेच, पण त्याशिवाय

ते न्यायी आणि करारीही होते. गैरशिस्त वर्तन त्यांना मुळीच खपत नसे.

अशा ह्या थोर अलौकिक पुरुषाच्या पराक्रमाच्या, निर्भयतेच्या न्यायी-पणाच्या नि करारीपणाच्या काही आठवणी सांगून ह्या थोर पुरुषाच्या स्मृतीला वंदन करून हे त्यांचे छोटेसे चरित्र पुरे करूया.

१

माधवराव मोठे निर्भय लढाऊ वीर होते. ते नेहमी आपल्या सैन्याच्या अग्रभागी असत.

कर्नाटकातील मोहिमेच्या वेळी समोर असणाऱ्या किल्ल्यावरून जोराचा गोळीबार होत असताना माधवराव ढाल

तलवार घेऊन निर्भयपणे पुढे झाले.

त्यामुळे त्यांच्या सैन्यालाही जोर चढला व थोड्याच वेळात किल्ला सर होऊन त्यावर मराठ्यांचा भगवा झेंडा फडकू लागला.

त्यांचे निर्भयपणाविषयी आणखी एक अशी गोष्ट सांगतात की, एकदा पेशवे छावणीत बसले असता लष्करातील एक माजलेला हत्ती मोकळा सुटला नि तो नासधूस करीत पेशव्याच्या तळा पर्यंत येऊन पोचला. छावणीतील बहुतेक मंडळी घाबरून सैरावैरा पळू लागली. माधवरावांच्या शेजारीच त्यांचा धाकटा भाऊ नारायणरावही बसला होता तोही घाबरून उठला. तेव्हा त्याचा हात धरून त्याला

खाली बसवून माधवरावांनी म्हटले नारायणा "अरे तू पळालास तर-इतिहासकार तुझ्याबद्दल काय म्हणतील?"

हे पेशव्यांचे बोलणे ऐकून सगळ्या पळणाऱ्या सरदारांनाही लाज वाटली. त्यांतील दोघा तिघांनी पुढे होऊन त्या हत्तीला मागे फिरविले. माधवरावांच्या निर्भय वृत्तीमुळे मोठे संकट टळले नि सरदार मंडळींना माधवरावांच्या निर्भय वृत्तीबद्दल आदर वाटू लागला.

२

माधवरावांचा आपल्या सरदारांवर फार लोभ असे. एकदा आप्पाजी पाटणकर व खंडेराव दरेकर यांना माधवरावांनी कर्जमुक्त करण्याचे वचन दिले होते.

पुढे आजारपणात एकदा त्यांना दिलेल्या वचनाची आठवण झाली. लागलीच त्यांनी त्या दोघा सरदारांना बोलावून घेतले व तुम्हांला कर्ज किती आहे ? असे विचारले. एवढ्या आजारपणातही आपले वचन पाळणाऱ्या पेशव्याबद्दल त्या दोघांना धन्यता वाटली. ते म्हणाले, "रावसाहेब, परमेश्वर कृपेने आपण बरे झाल्यावर द्याल ते घेऊ; आता आम्ही पैसे मुळीच घेणार नाही.

आपण बरे झालात की आम्ही कर्जमुक्त होऊ.

३

माधवराव जसे पराक्रमी होते तसेच ते न्यायीही होते. एकदा एखाद्याचे रक्षण

करण्याचे त्यांनी मान्य केले की मग तो शत्रूकडील माणूस असला तरी त्याला कोणी त्रास दिल्यास त्रास देणाऱ्याला ते शासन करीत असत.

हैदराचा मेहुणा मीर रेझा पेशव्यांच्या आश्रयासाठी आला. त्याला माधवरावांनी आश्रय देण्याचे मान्य केले. तो पेशव्यांच्याकडे असताना काही लोकांनी त्याला त्रास दिला. लागलीच पेशव्यांनी चौकशी करून अपराध्याला शासन केले !

४

माधवराव मोठे शिस्तप्रिय होते. माधवरावांचे मामा सरदार रास्ते यांनी नियमाप्रमाणे फौज ठेविली नाही व हिशेबही नीट ठेविले नाहीत. माधव-

रावांना हे कळताच त्यांनी रास्त्यांची भर दरबारात कडक शब्दांत निंदा केली व त्यांची जहागीर जप्त केली. मामा म्हणून त्यांची गय केली नाही. माधवरावांचे आपल्या आईवर फार प्रेम होते पण तिच्या रागाचीही पर्वा त्यांनी केली नाही.

५

माधवरावांचा स्वभाव फार तापट होता. त्यांना कोणतीही गैरवागणूक सहन होत नसे.

होळकरांचा दिवाण गंगोबा हा राघोबा दादांच्या बाजूचा होता. त्याला माधवरावांचे बोलणे व करणे आवडत नसे. भर दरबारात तो मध्येच काही तरी बोलत असे. त्याला असे न करण्या-

बद्दल सूचना देऊनही तो ऐकत नाही असे पाहून रागाच्या भरात माधवरावांनी त्या वृद्ध पण न ऐकणाऱ्या गंगोबाच्या फाडकन मुस्कटात भडकावली.

६

मोठमोठे सरदारही माधवरावांना भिऊन वागत. त्यांचा हुकूम कोणी मोडत नसे.

महादजी शिंदे यांच्यावर माधवरावांचा खूप लोभ होता. शिवाय महादजी शिंदे हे वयानेही खूप मोठे होते.

एकदा त्यांना पेशव्यांनी ताबडतोब उत्तरेत मोहिमेवर निघण्याची आज्ञा दिली. शिंद्यांनी त्या हुकुमाकडे थोडे दुर्लक्ष केले.

माधवरावांना राग आला. दुसऱ्या दिवशी माधवराव थेऊरला श्रीगणेशाच्या दर्शनाला जाण्यास निघाले असता रस्त्यात शिंद्यांची छावणी पाहून त्यांनी शिंद्यांना बोलावून सांगितले—

हे पाहा महादजीबाबा मी परत येताना तुमची छावणी येथे दिसली तर तुम्हाला कडक शासन करावे लागेल.

लागलीच शिंद्यांनी आपली छावणी उठवून उत्तरेकडे कूच केले!

७

माधवरावांचा स्वभाव फार करारी आणि तापट होता. त्यांना खोटेपणा किंवा लबाडी मुळीच आवडत नसे. लबाडी करणारांना त्यांनी कडक शिक्षा

केली, पण अनेक गुणवान माणसांना एकत्र करून राज्यकारभारात खूप सुधारणा केली. त्यांची राहाणी साधी असून आपण प्रजेचे सेवक आहोत असे ते मानीत.

राज्यकारभारातील सर्व गोष्टींकडे त्यांचे लक्ष असे. आपल्या प्रजेला नेहमी ताबडतोब न्याय मिळावा म्हणून त्यांनी चांगली व्यवस्था केली.

जे अधिकारी लबाडीने वागत त्यांना माधवरावांनी कडक शिक्षा केली.

कोणाकडून मोफत काम करून घेणे त्यांना मुळीच आवडत नसे. म्हणून त्यांनी वेठबिगारीची पद्धत बंद केली.

शेती-सुधारणा व निरनिराळ्या

उद्योगधंद्यांची वाढ ह्या गोष्टींकडेही त्यांनी लक्ष दिले.

राज्यांतील दंग्याधोप्यांचा कडक बंदोबस्त केला.

मराठे सरदारांची आपसांतील भांडणे मिटवून त्यांची एकी केली. त्यामुळे मराठी राज्याचा दरारा वाढला. पूर्वी ज्या सरदारांवर अन्याय झाला होता त्यांच्यावरील अन्याय माधवरावांनी दूर केला.

संताजी घोरपडे नावाचे सेनापती होते. त्यांचे सेनापतीपद जाऊन त्यांना प्राणास मुकावे लागले होते. त्यांच्यावर झालेला अन्याय दूर व्हावा म्हणून माधवरावांनी त्यांचा नातू मुरारराव ह्याला सेनापतीपद दिले.

माधवराव राज्यकारभारात कडक शिस्तीने वागत असले तरी खाजगी बाबतीत ते आपले चुलते रघुनाथराव ह्यांना फार मानाने वागवीत. त्यांचे आपल्या आईवर फार प्रेम होते. खाजगी बाबतीत [illegible]हमी आईच्या आज्ञेप्रमाणे वागत.

त्यांचा रामशास्त्री प्रभुण्यांवर फार विश्वास होता. राज्यकारभारातील प्रत्येक बाबतीत ते रामशास्त्र्यांच्या सल्ल्या-प्रमाणे वागत. रामशास्त्र्यांना पेशवे गुरूस्थानी मानीत.

तसेच महादजी बल्लाळ करकरे नावाचे एक दप्तरदार होते. ते करारी व अत्यंत विश्वासू होते. त्यांना माधवराव गुरुजी

म्हणत. त्यांचाही सल्ला माधवराव घेत असत.

आजूबाजूच्या अनेक शत्रूंचा बंदोबस्त करून पानिपतच्या युद्धामुळे उत्तरेकडे मराठ्यांचा वचक कमी झाला होता तो पुन्हा त्यांनी बसविला.

अशा प्रकारे प्रजेच्या सुखाकरिता झटणाऱ्या ह्या अल्पवयी पण महापराक्रमी पेशव्याला लोक दैवी अवतारच मानू लागले.

म. सं. मं. ..., ...नालय शाखा.
बाल ... विभाग.
ग, क्र. ४६५ दि. ...
विषय ... बा. बो.